# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 13/01/2023 (शुक्रवार) सायंकाळ**

---

**शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा**

**पो.स्टे. केळवद** :– दिनांक ०६/१०/२०१६ चे २३.४९ वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमोल प्रकाशराव खुबाळकर, वय ३० वर्ष, सहायक अभियंता रा. फरस चौक नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन केळवद येथे अप. क्र. २११/२०१६ कलम ३५३, ३३२, १४३, १८६, ५०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०६/१०/२०१६ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी हे सहायक अभियंता या पदावर कार्यरत असुन ४०० के. व्ही. विद्युत वाहिनी कोराडी ते तिडंगी वाहीनीचे काम पाहात होते. नमुद घटना वेळी व ठिकाणी टावर लाईन मुळे पिक नुकसान झालेल्या शेतकरी यांचे सोबत बोलत असतांना आरोपी नामे– १) सुनिल छत्रपाल केदार, वय ५४ वर्ष, रा. पाटणसांवगी ता. सावनेर २) मनोहर शंकर कुंभारे, रा. कळमेश्वर ३) वैभव अरूण घोंगे, रा. कळमेश्वर ४) दादाराव लेकराम देशमुख, रा. कळमेश्वर यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादीचे गालावर हाताने मारहाण करून सरकारी कामात अडथळा निर्माण केले. व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक योगेश पारधी पोस्टे केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक १३/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती मोटे मॅडम यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५३ भादवि मध्ये प्रत्येकी ०१ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावास, कलम ३३२ भादवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ५०००/–रू. दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद, कलम ५०४ भादवि मध्ये ०६ महिने साधी कैद व प्रत्येकी २०००/–रू. दंड, दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद, कलम ५०६ भादवि मध्ये ०६ महिने साधी कैद व प्रत्येकी २०००/– दंड, दंड न भरल्यास १५ दिवस कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. माहुरकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन १) पोहवा/३१ रविंद्र डोरले २) पोहवा/१५१७ अश्विन बैस पोस्टे केळवद यांनी मदत केली आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावर मौजा कांद्री वस्ती येथे दिनांक २८/१२/२०२२ चे पुर्वी फिर्यादी नामे– लिलेश मनीराम ठाकुर, वय ३५ वर्ष, रा. के. के नगर सी/ओ अरून मेंढे यांचे घरी किरायाने शितलवाडी ता. रामटेक यांचे कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत कांद्री खदान येथील आरोपी नामे– तुळशिराम शंकरराव बन्सोड, वय ५२ वर्ष, रा. कांद्री वस्ती ता. रामटेक जि. नागपुर याने नालीचे बांधकाम करीता निविदा टेंडर्स घेतला होता. परंतु सदर आरोपीने नालीचे बांधकाम करीता चोरीची रेती वापरल्याचे ग्रामपंचायत सदस्य व नागरिक यांनी लेखी तक्रार मा. तहसिलदार साहेब रामटेक यांना दिल्यावरून सदर अर्जाची चौकशी केली व फिर्यादीला तहसिलदार साहेबांचे आदेशाने फिर्यादीने आरोपीला रेतीची रॉयल्टी बाबत विचारपुस केली असता आरोपीने बनावटी रेतीची रॉयल्टी दाखविले व ३–१० ब्रास रेती वापरल्याने तहसिल रामटेक यांनी ३३६३५/–रू. दंडाची रक्कम शासन जमा केली. म्हणुन आरोपीने शासनाची दिशाभुल करून बनावटी रॉयल्टी तयार करून फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६८, ४७१ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक निशा भुते मो. नं. ९८२२५६६१८० हे करीत आहे.

## विश्वासघात

**पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर मौजा बस स्टॅन्ड पिंपळेश्वर मंदिर येथे रोहीत धान्य एन्ड किराणा भंडार रोड येथे दिनांक १२/०१/२०२३ चे ०९.०० वा. ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोहीत ओमकारजी लेंडे, वय २३ वर्ष, रा. मंगळवारी वार्ड रामटेक ता. रामटेक जि. नागपुर याने तोंडी रिपोर्ट दिली की, अनोळखी व्यक्ती याने पवन श्रीराम केळवदे रा. महात्मा फूले वार्ड रामटेक याचे सोबत बोलचाल करुन त्यास विश्वासात घेवून त्याची होन्डा कंपनीची शाईन मोटार सायकल काळया रंगाची लाल रंगाचा पट्टा असलेली, क्र MH.४० .CG. ६५०७ अंदाजे किंमती ६०,०००/– रु. ची त्याला परत आणून देतो म्हणून विश्वासात घेवून गेला तसेच फिर्यादी याचे परीचयाचा नामे– सुरज शिवरकर याचे सोबत फिर्यादीचे किराणा दुकानात येवून "मै ठेकेदार हू लेबर के लिये किराणा और चावल, तेल, मसाला, दाल इत्यादी चाहिये" असे म्हणून त्याला विश्वासात घेवून "लेबर यांना पैसे वाटप करायचे आहे" असे म्हणून फिर्यादी कडून प्रत्येकी १००/– रुपयांचे १०० नोटा असलेले ३ बंडल असे एकूण ३०,०००/– रु. व २००/– रुपयाचे १०० नोटा असलेला १ बंडल २०,०००/– रु. असे एकूण ५०,०००/– रु. व किराणाच्या सामानाचे रक्कम दोन्ही एकत्र देतो असे सांगुन फिर्यादीला विश्वासात घेवुन व पवन केळवदे याची मोटार सायकल किंमती अंदाजे ६०,०००/– असा एकुण १,१०,०००/– रूपयाचा मुद्देमाल विश्वासघात करून पळून गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. १९८८ नितेश पिपरोदे मो. नं. ९९२१७११९५५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**